# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**

**No,CGRF/AZ/U / 198 / 2009 / 32** **Date :-**

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer ,
O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub:- Forwarding of grievance submitted by Shri G.A.Deshpande,
Flat No.204, Dhirendra Chamber, Samarthnagar, Aurangabad.
(Consumer No.490010597029)

Dear Sir,

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri G.A.Deshpande, Flat No.204, Dhirendra Chamber, Samarthnagar, Aurangabad.

You are requested to submit your reply on the grievance at the time of hearing..

The hearing in this matter is kept on 16.04.2009 at 11=30 Hrs.

Encl: As above

**Member/Secretary**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

**Copy to:-**

Shri G.A.Deshpande,
Flat No.204, Dhirendra Chamber,
Samarthnagar, Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१९८/२००९/३२**

**तक्रार दाखल दिनांक :- २३/०३/२००९**
**निकाल दिनांक :- २२/०५/२००९**

**श्री जी.ए. देशपांडे,**
**२०४ धीरेद्रं अपार्टमेंट,समर्थनगर,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१०५९७०२९) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २३/०३/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १५/०४/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकास माहे ऑगस्ट २००५ चे अवास्तव वीज बिल प्राप्त झाले. त्या बिलाबाबत त्यांनी महावितरणचे संबंधीत अधिका-याकडे दिनांक ११/१०/२००५ रोजी लेखी तक्रार केली आहे. त्यानंतर त्यांचे जुने मीटर बदली करुन त्यांना नविन मीटर बसवुन देण्यात आले. कनिष्ठ अभियंता यांनी १५ युनिट प्रति महा असा शेरा दिनांक १२/१०/२००६ चे स्थळ निरिक्षण अहवालमध्ये दिला आहे. परंतु प्रत्यक्षात वीज वापर ८ युनिट प्रति महा असल्याचे ग्राहकाचे म्हणणे आहे. माहे ऑगस्ट २००५ चे रुपये १४९६०/-चे देयक वारंवार विनंती करुनही दुरुस्त करण्यात आले नाही व त्यानंतर कोणतीही पुर्वसुचना न देता दिनांक ०५/१०/२००६ रोजी विद्युत पुरवठा कायमचा खंडीत करण्यात आला. ग्राहकाने वरील वीज देयक दुरुस्त करुन मीळण्याबाबत, त्यामध्ये कोणतेही व्याज व दंडाची आकारणी न करण्याबाबत तसेच झालेल्या मनःस्तापाची नुकसान भरपाई मिळण्याबाबत विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक १५/०४/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस ग्राहक श्री सुरेश देशपांडे व नोडल अधिकारी श्री राठौर उपस्थित होते नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचे तक्रारीवर जवाब दाखल केला व ग्राहकाने विजेची थकबाकी न भरल्यामुळे त्यांचा विद्युत पुरवठा माहे ऑक्टोबर २००७ पासुन कायमचा बंद करण्यात आल्याचे सांगितले. मंचामध्ये उपस्थित झालेले तक्रारकर्ते श्री सुरेश देशपांडे हे अधिकृत ग्राहक नसल्याबाबत आक्षेप नोडल अधिकारी यांनी घेतला त्यावरुन तक्रार कर्ते श्री सुरेश देशपांडे यांनी वीज ग्राहक श्री गोपाळराव आप्पाराव

देशपांडे यांचे कडुन वरील घर सन १९९५ मध्ये विकत घेतल्याचे सांगितले व पुढील सुनावणीमध्ये त्याबाबत दस्तऐवज दाखल करणार असल्याचे सांगितले दोन्ही बाजु ऐकुन घेतल्यानंतर पुढील सुनावणी दिनांक २१/०४/२००९ रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक २१/०४/२००९ रोजी अर्जदार श्री सुरेश देशपांडे व नोडल अधिकारी श्री राठौर उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी माहे ऑगस्ट २००५ चे एकत्रीत ३०३१ युनिट चे वीज बिल सप्टेबर २००४ ते ऑगस्ट २००५ या कालावधीकरीता समप्रमाणात विभागुन दिले असल्याचे व रुपये ३२५६/- कमी करुन आज रोजी ग्राहकाकडे रुपये १९८७४/- थकबाकी प्रलंबीत असल्याचे सांगितले. दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकुन घेतल्यानंतर प्रकरण निकाला करीता ठेवण्यात आले.

४) दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागदपत्रावरुन असे लक्षात येते की,श्री गोपाळ आप्पाराव देशपांडे राहणार प-लॅट क्रमांक २०४ धिरेद्र चेंबर शांतीनगर औरंगाबाद यांनी घरगुती वीज वापरा करीता तेव्हाचे विद्युत मंडळाकडुन दिनांक २८/०२/१९८१ रोजी विद्युत पुरवठा घेतला आहे. त्याचा ग्राहक क्रमांक ४९००१०५९७०२९ असा आहे.वरील प-लॅट श्री सुरेश दतात्रय देशपांडे यांनी सन १९९५ मध्ये विकत घेतला व वरील कनेक्शनचा वापर ते स्वतः करीत आहेत. जुन २००५ पर्यंत वीज बिलाबाबत ग्राहकाची कोणतीही तक्रार नव्हती. माहे ऑगस्ट २००५ मध्ये ग्राहकास मागील रिडींग ६५२१ व चालु रिडींग ९५५२ दाखवीत एकुण ३०३१ युनिट चे रुपये १४५८६.५६ चे देयक देण्यात आले.ग्राहकाने त्याबाबत दिनांक ११/१०/२००५ रोजी लेखी तक्रार महावितरणचे संबंधीत अधिका-याकडे केली आहे. परंतु त्यांना सुधारीत देयक मीळाले नाही. त्यानंतर दिनांक २४/१०/२००५ रोजी त्याचे मीटर ( क्रमांक ९००११७३६०१) बदली करुन नविन मीटर (क्रमांक ९००००४५६१०६) लावण्यात आले. मीटर बदली अहवालाप्रमाणे जुन्या मीटरचे शेवटचे रिडींग ९६१५ व नविन मीटरचे सुरुवातीचे रिडींग ००० असे नोंदविण्यात आले आहे. सी.पी.एल. वरुन माहे ऑगस्ट २००५ पुर्वी

ग्राहकाचा १२ महीन्याचा वीज वापर सरासरी २३ युनिट प्रतिमहा आढळुन येतो. कनिष्ठ अभियंता यांनी दिनांक १७/०१/२००६ रोजी केलेल्या स्थळ अहवालानुसार ग्राहकाचे जुने मीटर क्रमांक ११७३६०१ चे आकडे फॉल्टी झालेले असावेत व नविन मीटर नुसार ग्राहकाचा वीज वापर सरासरी १५ युनिट प्रतिमाह असल्याची नोंद केली आहे.

५) वरील सर्व निरीक्षणावरुन असे आढळुन येते की,ग्राहकाचे जुनें मीटर क्रमांक ११७३६०१ हे दोषपुर्ण असुन त्याचे अंतीम रिडींग चुकीचे असल्यामुळे ते गृहीत धरणे योग्य होणार नाही.वरील मीटर नादुरुस्त होण्यापुर्वी म्हणजे ऑगस्ट २००५ पुर्वीच्या १२ महीन्याच्या कालावधीकरीता असलेला ग्राहकाचा वीज वापर गृहीत धरुन आकारणी करणे योग्य होईल असे मंचाचे मत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास दिलेले माहे ऑगस्ट २००५ चे वीज बिल रद्द करण्यात येत आहे. त्याऐवजी २३ युनिट वापराचे सुधारीत देयक देण्यात यावे.

२) सप्टेबर २००५ ते ०५/१०/२००६ या कालावधी करीता नविन मीटरचे रिडींग नुसार वीज बिल देण्यात यावे.त्यामध्ये व्याज,दंड व विलंब आकार लाऊ नये.

३) सुधारीत बिलाचा भरणा केल्यानंतर नियमाप्रमाणे स्थिरआकार घेऊन ग्राहकाचा घरगुती वीज पुरवठा ३० दिवसाच्या आंत जोडुन द्यावा.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१९८/२००९/३२** **दिनांक :-**

**प्रति,**
**श्री जी.ए. देशपांडे,**
**वापनार श्री सुरेश द.देशपांडे,**
**२०४ धीरेद्रं अपार्टमेंट,समर्थनगर,**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१९८/२००९/३२ )

आपण दिनांक २३/०३/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**